(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टिकोन एक अभ्यास

**विमल अंकुश कोळी,** संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय पेठ वडगांव.

**डॉ..प्रतिभा सदाशिव देसाई,** आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.

---

**सारांश:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. मानवी जीवनातील सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांना त्यांनी स्पर्श केला आहे. घटनाकार, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ,मानव मुक्तीचे महानायक,दीनदुबळ्या, दलितांचेमुक्तिदाते अशी विविधांगी आयाम आहे. भारतीय शिक्षणाचा पाया घातला. डॉ.. बाबासाहेबांनी त्या काळात उच्च शिक्षणाचा आग्रह धरला. बाबासाहेबांनी शिक्षणाला व्यवहारांची जोड मिळवून दिली.शिका, संघटित व्हा आणिर संघर्ष करा,हा संदेश दिला. बाबासाहेबांना उच्च शिक्षणाव्दारे समता, स्वातंत्र्य बंधुता स्वीकारलेला एक स्वाभाविक आधुनिक समाज निर्माण करायचा होता.

शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग हे जाणून विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे.शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे.त्याचा उपयोग झाला पाहिजे.जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्यपूर्व काळात सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ३ लाख रुपयांचा निधी मिळवला होता.त्याचाच परिणाम आज लाखो रुपयांची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळते आहे.शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे आणि आपल्या शिक्षणापासून वंचित समाजाला शिक्षणाचे महत्व अत्यंत सोप्या भाषेत आणि कळकळीने सांगताना बाबासाहेब म्हणतात "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे तो जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक अटी आणि परंपरा पासून सुटका मिळावी यासाठी अथक प्रयत्न केले. अत्यंत कठोर मेहनत घेऊन सर्व बारकावे तपासून भविष्यातील वेध घेऊन 'हिंदू कोड बिल ' मसुदा लिहला.ज्याला तब्बल ४ वर्ष १ महिना व २६ दिवस लागले. स्त्रियांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्व अधिकार कायद्याने देण्यासाठी एवढे परिश्रम घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातील शिक्षणविषयक कलमामुळे शैक्षणिक क्रांती बघण्यास मिळाली.ते एक शिक्षणतज्ज्ञ, प्रज्ञासुर्य विश्वभूषण होते.त्यांना लोकशिक्षक या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य करून आपले शिक्षणविषयक विचार मांडले.शिक्षणविषयक विचारांमुळे समाजातील झालेला आमुलाग्र बदलांचा, दुरदृष्टीचा अभ्यास व्हावा या हेतूने संशोधिकेने प्रस्तुत संशोधन विषय निवडला आहे.

शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग हे जाणून विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे.शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे.त्याचा उपयोग झाला पाहिजे.जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्यपूर्व काळात सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ३ लाख रुपयांचा निधी मिळवला होता.त्याचाच परिणाम आज लाखो रुपयांची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळते आहे.शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे आणि आपल्या शिक्षणापासून वंचित समाजाला शिक्षणाचे महत्व अत्यंत सोप्या भाषेत आणि कळकळीने सांगताना बाबासाहेब म्हणतात "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे तो जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक अटी आणि परंपरा पासून सुटका मिळावी यासाठी अथक प्रयत्न केले. अत्यंत कठोर मेहनत घेऊन सर्व बारकावे तपासून भविष्यातील वेध घेऊन 'हिंदू कोड बिल ' मसुदा लिहला.ज्याला तब्बल ४ वर्ष १ महिना व २६ दिवस लागले. स्त्रियांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्व अधिकार कायद्याने देण्यासाठी एवढे परिश्रम घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातील शिक्षणविषयक कलमामुळे शैक्षणिक क्रांती बघण्यास मिळाली.ते एक शिक्षणतज्ज्ञ, प्रज्ञासुर्य विश्वभूषण होते.त्यांना लोकशिक्षक या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य करून आपले शिक्षणविषयक विचार मांडले.शिक्षणविषयक विचारांमुळे समाजातील झालेला आमुलाग्र बदलांचा, दुरदृष्टीचा अभ्यास व्हावा या हेतूने संशोधिकेने प्रस्तुत संशोधन विषय निवडला आहे.

**मुख्य संबोध**

शैक्षणिक दृष्टीकोण, स्त्री शिक्षण विचार,प्राथमिक शिक्षण विचार, संविधानातील शिक्षणविषयक कलमे.

**प्रस्तावना**

शिक्षणामुळे परिवर्तन होते हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचे सूत्र आहे. समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन नाही. स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्यायमूल्यावर आधारित समाज घडवण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीव ही डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. व्यक्तीला जाणीव करून देते की तेच शिक्षणाची शिक्षणाची व्याख्या त्यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामाला त्याच्या गुलामीची गुपित सांगताना सांगितले की उपासमारीने शरीराचे शोषण कमी झाल्यास माणूस होतो तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणे दुसऱ्याचा गुलाम होतो शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते म्हणून स्वाभिमानाने स्वावलंबाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला समाज सुधारण्याचे मूळ मांडले आहे त्यांच्या मते संघटित होऊन संघटन शक्ती मजबूत करून संघर्षाकडे जाण्यासाठी लोकांनी सर्वप्रथम शिकले पाहिजे हा मोलाचा संदेश दिला शिक्षणाशिवाय आपली शक्ती जागृत होणार नाही आपण स्वतःला ओळखले पाहिजे आपण कोणत्या पातळीवर आहोत याची जाणीव असली पाहिजे त्याशिवाय आपल्यातील माणूस जागा होणार नाही या सर्व बाबी करता एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे शिक्षण.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानातील शिक्षणविषयक कलमे अभ्यासणे.

**संशोधनाचे महत्त्व**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वातंत्र पूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण विषयक विचार समजण्यासाठी प्रश्न संशोधन महत्वाचे आहे झाले.

2. कायद्याने मिळालेले अधिकार देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले परिश्रम विचाराचे दूरदृष्टी आणि प्रगल्भता समजण्यासाठी स्त्री विषयक विचार अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

3. वंचित दुर्लक्षित घटकांसाठी संविधानाने दिलेले शिक्षण विषयक अधिकार मूलभूत हक्क व कर्मांची माहिती समजण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.

**संशोधनाची परिमर्यादा**

प्रस्तुत संशोधन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्राथमिक शिक्षण विचार.स्त्री शिक्षणविषयक विचार आणि संविधानातील शिक्षणविषयक कलाविषयक विचारांपुरते मर्यादित आहे.

**विश्लेषणात्मक विषय विवेचन**

**प्राथमिक शिक्षण विषयक विचार**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शास्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्काची जाणीव होते, म्हणून ते अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे. प्राथमिक शिक्षण असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाली की तो किंवा ती पूर्णपणे सुशिक्षित माहिती पूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावी शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे होते की समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिक दृष्ट्या सशक्त होते. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी अनन्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञान प्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्य योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे.

डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत मुलांच्या शिक्षणासाठी विविध परिषदा मधून ठराव केले. 21 व 22 मार्च 1920 रोजी दक्षिण महाराष्ट्रातील परिषद कागल संस्थान मधील माणगाव या ठिकाणी भरली होती. त्यात शिक्षणाबाबतही ठराव मांडले व प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत झाले पाहिजे असे स्पष्ट केले.

ठराव -5 - प्राथमिक शिक्षण मुला मुलींचा भेद न करता जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सक्तीचे मोफत करण्यात यावे.

ठराव -8 - सर्वत्र स्पृश्य व अस्पृश्यांच्या शाळा एकत्र असाव्यात.

6 मे 1929 रोजी मुंबई सरकारचे शिक्षण मंत्री ना मौलवी रफी उद्दीन अहमद यांच्या उपस्थितीमध्ये महाबळेश्वर येथे प्राथमिक शिक्षणाची प्रगती झपाट्याने कशी करता येईल याचा विचार करण्यासाठी भरलेल्या परिषदेमध्ये डॉ.. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसार होण्यास काही शतके लागतील.

**स्त्री शिक्षणविषयक विचार**

डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याची सुरुवात 1920 मध्ये झाली असली तरी 4 ऑगस्ट 1913 साली त्यांनी मुलींच्या शिक्षणाविषयी प्रखर विचार मांडले आहेत मुलांच्या शिक्षणासोबत आम्हाला मुलींच्या शिक्षणाचा ही तेवढाच गंभीरतेने विचार करावा लागेल. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे स्त्रियांनी स्वच्छ राहण्यास शिकावे व सर्व दुर्गुणांपासून मुक्त राहावे तुमच्या मुलांना शिक्षण द्या हळूहळू त्यांच्या मनात महत्त्वकांक्षा जागृत करा ते थोर पुरुष होणार आहेत असे त्यांच्या मनावर बिंबवा.

डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती विषयक कार्य हे केवळ उपेक्षित वंचित घटकातील स्त्रियांपुरतेच मर्यादित नव्हते तर देशातील सर्व स्त्री वर्गाच्या उद्धाराचे कार्यवृत्त त्यांनी घेतले होते जाती वर्ग विरहित स्त्री वर्गाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या लिखाणातून भाषणातून व चळवळीतून विचार मांडले आहेत एकूणच भारतीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यात विद्यार्थीदशे पासूनच स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेत असताना आपल्या वडिलांचे स्नेही सुभेदार शिवनाक जमेदार यांना न्यूयॉर्क वरून 4 ऑगस्ट 1913 रोजी पाठवलेल्या पत्रातून डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री स्वातंत्र्य व स्त्री शिक्षणाबद्दलचा उदात्त दृष्टिकोन स्पष्ट होतो. अर्थात आईबाप आपल्या मुलाला जन्म देतात कर्म देत नाही असते त्यांचे म्हणणे ठीक नाही. आई बाप मुलांच्या आयुष्यात वळण लावू शकतात ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली तर समाजाची प्रगती होईल.

स्त्रियांना उद्देशून तुम्ही मुला मुलींना शिक्षण द्या परंपरागत कामात गुंतवू नका. तुम्ही जे काम करतात त्या कामात त्यांना पडून देण्याची खबरदारी घ्या मुला मुलींना शिक्षण देण्यात कसूर करू नका. तुमची मुले शिक्षण घेऊन मोठ मोठ्या पदावर गेली पाहिजेत. त्यांना खूप खूप शिकवा त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत बालपणीच त्यांची लग्न करू नका कारण शिक्षणातच ती शक्ती आहे. शिक्षण हाच सर्व सुधारण्याचा पाया आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा प्रभाव होता. आंबेडकरांच्या मते बौद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होते.
आंबेडकरांच्या मध्ये कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. औरंगाबादला त्यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. इथे मुलींनाही प्रवेश दिला.

खाण कामगार स्त्रीला प्रसुती भत्ता कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषा इतकीच मजुरी बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंध, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी 21 दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि 20 वर्षाची सेवा झाल्यावर निवृत्ती वेतनाची तरतूद यासारख्या महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख करायला हवा कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रसुती रजा मिळवून देणाऱ्या आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत.

आंबेडकरांनी 1947 मध्ये कायदेमंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. अस्पृश्यतेचे उच्चाटन लग्न संबंधातील स्त्री पुरुष समानता स्त्रियांना काडीमोड घेण्याचा अधिकार वारसा हक्काचे लाभ स्त्रियांनाही देण्याची तरतूद या तत्त्वांचा यात समावेश होता.

ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोपमधल्या स्त्रियांना संघर्ष करावा लागला तो अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच आंबेडकरांनी दिला. कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच निगडित असल्याची स्पष्ट भूमिका घेतलेली दिसते

आंबेडकरांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. 1927 चा महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह 1930 चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह 1942 नागपुरातल्या महिला परिषदेत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

लग्न ही मुलींच्या प्रगती मधील अडचण असून मुलींवर ते लादले जाऊ नये. लग्नानंतर पत्नी ही नवऱ्याची मैत्रीण व समान अधिकार असलेले सहचारणी असायला, ती नवऱ्याची गुलाम व्हायला नको असे ते म्हणत. बायको कशी असावी याबाबत पुरुषांचे मत घेतले जाते. तव्दवत स्त्रीचे नवऱ्या विषयीचे मत आवडीनिवडी विचारात घेतले पाहिजेत.

भारतात प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृती रूढ होती व समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते हिंदू कोड बिल (हिंदू संहिता विधेयक) हे स्त्रियांच्या सशक्तीकरणासाठी एक पाऊल होते. भारत स्वातंत्र्य झाला तेव्हा हिंदू समाजात पुरुष आणि महिलांना घटस्फोटाचा अधिकार नव्हता. पुरुषांना एकापेक्षा अधिक लग्न करण्याचे स्वातंत्र्य होते परंतु विधवांना दुसरे लग्न करू शकत नाही. विधवांना संपत्ती पासून सुद्धा वंचित ठेवण्यात आले होते. या बिलाने हिंदू धर्मातील कूप्रथांना दूर केले. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलात सर्वसामान्य महिलांसोबत विधवा व तिच्या मुलींना मुलांबरोबरचा वारसा हक्का दर्जा देऊ केला. महिलांना तिच्या पतीच्या मालकीची संपत्ती विकण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला. दत्तक मुलाला वारसा हक्क हिंदू कोड बिलामुळे मिळाला. हिंदू कोड बिलात बहुपत्नीत्व प्रथेला मज्जाव करून एक पत्नीत्वाचा पुरस्कार केला.

**संविधानातील शिक्षणविषयक कलमे**

कलम-४५ अर्ली चाइल्डहुड केअर आणि शिक्षणासाठी तरतूद भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ बालपणीची काळजी आणि शिक्षणाच्या महत्त्वावर जोर देण्यात आला आहे. राज्य सर्व मुलांची वयाच्या सहा वर्षे पूर्ण करेपर्यंत त्यांना लवकर बालपण काळजी आणि शिक्षण देण्याचा प्रयत्न करेल ही तरतूद मुलांच्या विकासातील मजबूत पायाचे महत्त्व ओळखते आणि प्रारंभिक शिक्षणासाठी सरकारची वचनबद्धता अधोरेखित करते.

अनुच्छेद -४६-अनुसूचित जाती-जाती अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटक घटकांच्या घटकांच्या शैक्षणिक आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन अनुच्छेद 46 मध्ये अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीयांना समाजातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या वंचित घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक ही संबंधांना प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करते शिक्षणातील असमानता दूर करण्यासाठी आणि या उपेक्षित समुदायाच्या उन्नतीसाठी सकारात्मक कृती करण्याचे काम राज्यावर आहे. या तरतुदीत सर्व समावेशक शिक्षण आणि सर्वांसाठी समान संधी यांच्या महत्त्वावर भर आहे.

कलम५१A- मूलभूत कर्तव्य आणि शिक्षणाचे महत्त्व

घटनेच्या घटनेचे कलम 51A मध्ये भारतातील प्रत्येक नागरिकाची मूलभूत कर्तव्य नमूद केली आहेत त्यात मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आणि भारतातील सर्व लोकांमध्ये एकोपा आणि समान बंधू भावाची भावना वाढवणे हे कर्तव्य समाविष्ट आहे ही तरतूद सामाजिक एकता राष्ट्रीय एकात्मता आणि जबाबदार नागरिकत्व वाढवण्यासाठी शिक्षणाची भूमिका अधोरेखित करतो.

कलम 41 -कामाचा अधिकार शिक्षण आणि काही प्रकरणांमध्ये सार्वजनिक सहाय्य

बेरोजगारी, म्हातारपण, आजारपण आणि अपंगत्वाच्या बाबतीत काम शिक्षण आणि सार्वजनिक मदतीच्या संधी उपलब्ध करून देणे हे राज्य सरकारच्या सामाजिक कल्याण उपक्रमाचा एक भाग म्हणून शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अधोरेखित करते.

अनुच्छेद ३०- अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि प्रशासन करण्याचा अधिकारांची मान्यता शैक्षणिक संस्थांद्वारे वेगळी भाषा संस्कृती धर्म जतन व संवर्धन करण्याच्या त्यांच्या अधिकारांचे रक्षण करते.

अनुच्छेद 350 - प्राथमिक टप्प्यावर मातृभाषेतील शिक्षणाच्या सुविधा-

350A- प्राथमिक स्तरावर शिक्षणासाठी लोकसंख्येच्या वापरल्या जाणाऱ्या मातृभाषा किंवा भाषेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या महत्त्वावर जोर देते प्रभावी शिक्षण आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी मुलांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळावे हे सुनिश्चित करणे.

कलम 15 धर्म वंश जात लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंधन करते. संस्थांमध्ये प्रवेशाच्या बाबतीत सर्व नागरिकांना समान वागणूक आणि संधी सुनिश्चित करते तरतुदीमुळे सरकारला सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी किंवा कोणत्याही सामाजिक किंवा शैक्षणिक दृष्ट्या वंचित गटाच्या प्रगतीसाठी विशेष तरतुदी करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

कलम 16 - सार्वजनिक रोजगारातील संधीची समानता-

धर्मात लिंग जन्मस्थळ याचा भेदभाव करण्यास प्रतिबंध करते प्रतिबंधित करते ही तरतूद सामाजिक किंवा शैक्षणिक पार्श्वभूमीची पर्वा न करता गुणवत्ता आणि समान प्रवेशाची हमी देतो पात्रतेवर आधारित शैक्षणिक पदांसह सरकारी नोकरीत हमी देतो.

**निष्कर्ष**

कोणत्याही राष्ट्राच्या विकासात आणि प्रगतीमध्ये शिक्षणातील भूमिका महत्वाची असते भारतात शिक्षणाचे महत्त्व केवळ मान्य केले जात नाही तर संविधानाने संरक्षण दिले आहे.

राज्यघटनेतील शैक्षणिक तरतुदी दर्जेदार शिक्षणासाठी समान प्रवेश प्रदान करण्याच्या देशाच्या वचन बद्ध प्रतिबिंबित करतात या तरतुदी मूलभूत अधिकार म्हणून शिक्षणाच्या अधिकाराची हमी देतात.

1. आजच्या आधुनिक भारता मुलांच्या बरोबरीने मुलींना शिक्षण दिले जाते .
2. स्त्रियांनी आपले हक्क मिळवण्यासाठी स्वतः पुढे यायला हवे हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला
3. आंबेडकरांनी केवळ दलित स्त्रियांचा विचार केला नसून समस्त स्त्री वर्गाचे प्रश्न ऐरणीवर आणली. आता नंतरच अनेक वर्षांनी इतर देशातील महिलांना प्रस्तुती रजा मंजूर झाल्या.
4. हिंदू कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून हिंदू विवाह कायदा हिंदू वारसा हक्क कायदा हिंदू पालक तत्व कायदा हिंदू दत्तक व पोटगी कायदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथकपरिश्रमाचे परिणाम आहे.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले व कलम 21 A च्या तरतुदींना लागू करण्यासाठी शिक्षण अधिकार (RTE) कायदा 2009 मध्ये लागू करण्यात आला.

**संदर्भसूची**

कीर धनंजय, डॉ बाबासाहेब आंबेडकर,पाप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९

भारताचे संविधान चौधरी लाॅ पब्लिशर्स,नारायण पेठ पुणे ४११०३०सतरावी आवृत्ती २०२४.

प्रा.बाळ गाडगीळ, डॉ बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या शब्दांत आणि अनेकांच्या (२०१४)मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि.२५१क, शनिवार पेठ,पुणे ४११०३०.

Best,j.w.(2007) Research in education Englewood Cliffs N.J prentice hall.

https://www.Maharashtra times.

https:www.tv9marathi.com

Shodhanga.Inflibnet.ac.in Retrieved on set.2024

https:www.mr. Wikipedia. Retrieved on sep2024.